# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

## छत्रपती संभाजीनगर

नॅक 'अ+' दर्जा प्राप्त

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

## परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे प्राचार्य, अध्यापक, कर्मचारी व प्रवेशित विद्यार्थी, कोहिनुर महाविद्यालय, खुल्ताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर यांना कळविण्यात येते की, दिनांक १४.१०.२०२५ रोजी पार पडलेल्या मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील ऐनवेळचा विषय (प्रस्ताव क्र. ०१ वर) एक मताने घेण्यात आलेल्या निर्णयानुसार कोहिनूर महाविद्यालय, खुल्ताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर या महाविद्यालयाच्या बाबतीत मा. जिल्हा सत्र न्यायालय, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १२.१०.२०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार महाविद्यालयाची इमारत सिलबंद करुन जप्त केली आहे व त्यामुळे तेथील दैनंदिन कामकाज बंद आहे. परंतु कोहिनुर महाविद्यालय, खुल्ताबाद येथील प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या नोव्हेंबर/डिसेंबर, २०२५ मध्ये होणाऱ्या हिवाळी-२०२५ च्या परीक्षेसाठीचे परीक्षा आवेदनपत्र भरण्यासाठी चिश्तिया महाविद्यालय, खुल्ताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर या महाविद्यालयात स्वतंत्ररित्या "सुविधा केंद्र" तयार करण्यात आले असुन कोहिनुर महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांना पुढील आदेशापर्यंत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ चे कलम ४८(४) नुसार नियमीत सुविधा पुरविण्यात येणार आहे.

**त्यानुसार कोहिनुर महाविद्यालय, खुल्ताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर येथील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदन पत्र व परीक्षा शुल्क विना विलंब शुल्कासह दि. ३१.१०.२०२५ रोजी पर्यंत सुविधा केंद्र, चिश्तिया महाविद्यालय, खुल्ताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर येथे स्विकारण्यात येतील.**

करिता, उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन सर्व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षार्थीनी परीक्षा आवेदन पत्र व परीक्षा शुल्क सादर करावे. प्रभारी प्राचार्यांनी महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास हे परिपत्रक आणून द्यावे.

हे परिपत्रक विद्यापीठाच्या bamu.ac.in and http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| विद्यापीठ प्रांगण, छत्रपती संभाजीनगर | : | **प्रा. (डॉ.) बाबासाहेब एन. डोळे** |
| संदर्भ क्र. : परीक्षा व मूल्यमापन/समन्वय/२०२५-२६/688 | : | संचालक, |
| दिनांक : १५.१०.२०२५ | : | परीक्षा व मूल्यमापन मंडळ |

यापत्राची प्रत: प्राचार्य, कोहिनुर महाविद्यालय, खुल्ताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर व चिश्तिया महाविद्यालय, खुल्ताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.